**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**बुधवार दिनांक २८ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

**1. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान अपघातात निधन, उद्या बारामती मध्ये होणार अंत्यसंस्कार, राज्यात ३ दिवसांचा दुखवटा जाहीर**

**2. अजित पवारांच्या निधनाबद्दल पंतप्रधान राष्ट्रपतीसह देशभरातून शोक व्यक्त, लाखो समर्थकांकडून हळहळ व्यक्त**

**3. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला प्रारंभ**
**4. विदर्भात ढगाळ वातावरणाने किमान तापमानात वाढ, पश्चिम विदर्भात पावसाचा इशाराआता सविस्तर बातम्या …….**

**अजित पवार निधन मुख्य**

राज्याचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री, आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचं आज विमान अपघातात निधन झालं. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या प्रचारसभांसाठी त्यांचं विशेष विमान बारामतीला उतरत असताना अपघातग्रस्त झालं आणि विमानातल्या सर्व ५ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक सुमित कपूर, शांभवी पाठक आणि विमान कर्मचारी पिंकी माळी यांचा समावेश आहे. अपघातस्थळी विमानानं थेट पेट घेतला. विमानाचा ब्लॅक बॉक्स, वैमानिकाचं संभाषण याची पडताळणी केल्यावर अपघाताचं कारण कळू शकेल, असं पोलिसांनी सांगितलं.अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे २२ जुलै १९५९ मध्ये अजित पवार यांचा जन्म झाला. १९८२ मध्ये अजित पवार यांनी सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाचे सदस्य म्हणून राजकारणात प्रवेश केला. १९९१: पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. १९९१ मध्ये ते १० व्या लोकसभेत खासदार म्हणून निवडून आले. अवघ्या चार महिन्यांत त्यांनी या पदाचा राजीनामा दिला. १९९५ साली अजित पवार बारामती मतदारसंघातून पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आले. १९९९ मध्ये बारामती मतदारसंघातून ते महाराष्ट्र विधानसभेवर पुन्हा निवडून आले. त्यांना पहिल्यांदाच मंत्रिमंडळात

समाविष्ट करण्यात आले. विलासराव देशमुख यांच्या कार्यकाळात त्यांनी ऑक्टोबर १९९९ ते डिसेंबर २००३ पर्यंत सिंचन मंत्री म्हणून काम पाहिले. डिसेंबर २००३ ते ऑक्टोबर २००४ पर्यंत पवार यांनी ग्रामीण विकास मंत्री म्हणूनही काम पाहिले. महाराष्ट्राचे उप-मुख्यमंत्रीपद ४ वेळा भूषविण्याचा बहुमान त्यांना मिळाला. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून वेगळं होऊन ते राज्यातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारमध्ये सामील झाले आणि परत एकदा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाले.

**शोक संदेश**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि  पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. पवार यांच्या निधनाने कधीही भरून न निघणारं नुकसान झालं आहे, महाराष्ट्राच्या विकासासाठी ते सदैव स्मरणात राहतील असं राष्ट्रपती समाज माध्यमावरल्या संदेशात म्हणाल्या. त्यांनी पवार कुटुंबीय, त्यांचे समर्थक यांच्याबद्दल सहवेदना व्यक्त केल्या.  महाराष्ट्राच्या जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या अजित पवार यांच्याविषयी लोकांना अपार आदर होता, अशी भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. अजित पवार यांची प्रशासनावर जबरदस्त पकड होती, त्यांची नाळ जनसामान्यांशी घट्ट जोडलेली होती, असं  पंतप्रधान म्हणाले. दरम्यान नवी दिल्ली येथे  राष्ट्रीय छात्र सेना NCC  रॅलीला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी अजित पवारांचा अकाली निधनाबद्दल शोक  व्यक्त करताना सांगितलं की

***अजित दादा ने महाराष्ट्र और देश के विकास में अपना बड़ा योगदान दिया है। विशेष रूप से गांवों के जीवन को बेहतर बनाने के लिए उन्होंने हमेशा आगे बढ़कर काम किया। मैं अजीत पवार जी के परिवार के प्रति संवेदना व्यक्त करता हूं। जिन साथियों को हमने इस हादसे में खोया है, इस पीड़ा की घड़ी में हम सभी उनके परिजनों के साथ हैं।***

लोकसभा आणि राज्यसभेने आज  अजित पवार,  यांना श्रद्धांजली वाहिली अजित पवार हे १० व्या लोकसभेचे सदस्य होते. त्यांच्या सन्मानार्थ सभागृहात मौन पाळण्यात आले.लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनीही  अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. सहकार चळवळ आणि राज्याच्या विकासाच्या माध्यमातून ते जनतेच्या सदैव स्मरणात राहतील असं बिर्ला म्हणाले. अजित पवार यांचं निधन आपल्यासाठी वैयक्तिक आणि रालोआसाठीही मोठं नुकसान आहे, अशी भावना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केली.  अजित पवार महाराष्ट्राचा विकास आणि समृद्धीसाठी वचनबद्ध होते, अशी प्रतिक्रिया संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचं वृत्त अतिशय धक्कादायक आणि दुर्दैवी असल्याची भावना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. त्यांचं प्रशासकीय कौशल्य, विकासाचा दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यामुळे

राज्याच्या राजकारणात त्यांचं स्थान नेहमीच अढळ राहिलं आहे, असं गडकरी म्हणाले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही पवार यांना श्रद्धांजली वाहिली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. अजून मोठी राजकीय कारकीर्द पुढे असताना त्यांचं असं जाणं हे अकाली नुकसान आहे, अशी भावना खरगे यांनी व्यक्त केली. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अजित पवार यांचं निधन अत्यंत वेदनादायक आहे, अशी भावना व्यक्त केली. या दुःखद प्रसंगी आपण महाराष्ट्राच्या जनतेसोबत असून पवार कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करतो असं गांधी म्हणाले. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनीही अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**शोकसंदेश राज्य**

अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्र सुन्न झाला आहे. बारामती इथं त्यांच्या शोकाकुल अनुयायी, कार्यकर्ते आणि चाहत्यांची प्रचंड गर्दी झाली आहे. राज्यात शासनानं तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून आज सार्वत्रिक सुट्टी जाहीर केली आहे.महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. पवार यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि समर्थकांना हे दुःख सहन करण्याचं धैर्य मिळो अशी प्रार्थना त्यांनी केली. अजित पवार यांच्या जाण्याने एक दिलदार मित्र गमावल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. त्यांच्या निधनाच्या वृत्तावर विश्वास ठेवणं कठीण आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, राज्याच्या प्रश्नांची जाण असणारे ते संघर्षशील नेते होते, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

***महाराष्ट्राकरता आजचा दिवस हा अतिशय कठीण दिवस आहे. कारण अशा प्रकारचे नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्षे लागतात आणि ज्या वेळी महाराष्ट्राच्या विकासामध्ये अतिशय महत्वपूर्ण योगदान ते देत होते, अशा काळामध्ये त्यांचे निघून जाणं हे अविश्वसनीय आहे. मनाला चटका लावणार आहे.***

अजित पवार यांच्या जाण्यानं मोठा भाऊ गेल्याची आपली भावना आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. एक दूरदर्शी, स्पष्टवक्ता आणि अभ्यासू नेता आपण गमावला, असं शिंदे म्हणाले.

***माझ्यापेक्षा ते राजकारणात देखील अनुभवी नेते गेले अनेक वर्षापासूनचा त्यांचा अनुभव. वयाने देखील माझ्यापेक्षा ते मोठे होते माझे आणि अनुभवाने देखील आणि म्हणून त्यांना***

***राज्यातल्या अनेक विषयांचा गाढा अभ्यास होता. अनेक विभाग त्यांनी हाताळले होते, याचा राज्याला फायदा होत होता.***

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. तर महाराष्ट्राच्या पुरोगामी गडाचा एक खंबीर बुरूज कोसळल्याची भावना केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रानं एक उमदा नेता गमावला असं म्हटलं आहे. माजी मंत्री  आदित्य ठाकरे यांनीही पवार कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केल्या आहेत. अजित पवार यांच्या निधनाचं वृत्त अविश्वसनीय असल्याची भावना काँग्रेस नेते नाना पटोले यांनी व्यक्त केली. तर महाराष्ट्रानं एक उत्तम प्रशासक आणि लोकप्रिय नेता गमावल्याची भावना माजी मंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केली. दरम्यान राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इथं अजित पवार यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं .

**शासकीय इतमामात अंत्यसंस्कार दुखवटा**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त आणि  नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित आशाताई अनंतराव पवार यांचे आज दुःखद निधन झाले. यामुळे महाराष्ट्रात आज पासून ते ३० जानेवारी २०२६ या तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात उद्या अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असे सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) विभागामार्फत कळविण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृह मंत्री अमित शाह उद्या अंत्यसंस्काराला  उपस्थित राहणार आहे अशी माहिती आहे.. या तीन दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आला आहे . तसेच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे आज  राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये बंद ठेवण्यात आली.

**राष्ट्रपती अभिभाषण**

संसदेच्या अर्थसंकलपीय अधिवेशनाला आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने प्रारंभ झाला. संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर केलेल्या अभिभाषणात राष्ट्रपतींनी विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी सामूहिक निर्धाराची गरज असल्याचं सांगितलं. संसदेतल्या सर्व सदस्यांनी राष्ट्रहिताच्या प्रश्नांवर सरकारला साथ द्यावी असं आवाहन त्यांनी केलं. सरकारच्या

तिसऱ्या कार्यकाळात २५ कोटी जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यात सरकारला यश मिळाल्याचं त्या म्हणाल्या.

*मेरी सरकार ने महिलाओं के लिए समर्पित विशेष योजनाएं बनाए हैं और साथ ही अन्य योजनाओं के केंद्र में भी महिलाओं को रखा है। प्रधानमंत्री आवास योजना से लेकर जल जीवन मिशन तक, हर योजना में महिला लाभार्थियों को बड़ी वरीयता मिली है। विकास में महिलाओं की भागीदारी बढ़ाने के लिए मेरी सरकार ने दस करोड़ महिलाओं को स्वयं सहायता समूहों से जोड़ा है। आज देश में लखपति दीदियों की संख्या दो करोड़ से ज्यादा हो चुका है। मेरी सरकार कुल तीन करोड़ महिलाओं को लखपति दीदी बनाने के लक्ष्य को जल्द प्राप्त करने वाली है।*

**हवामान**

विदर्भातील अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्हयात आज तुरळक  ठिकाणी पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे वर्तवण्यात आली आहे. नागपूर मध्ये आज सकाळपासून ढगाळ वातावरण असून किमान तापमानात वाढ झाली आहे.  आज नागपुरात 16 पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली

******